# देश-स्थिती.

## पूर्वीची व आजची तुलना.

[ चाल-बडा मजा घेणार म्युनिसिपल ]

अहो राव ध्यानी आणा देश झाला दिनवाणा ॥धृ०॥
गडगंज व्हती, रत्न म्होरा किती, नव्ह त्याची गिनती,
आज टक्काबी कुठ गवसना ॥१॥
मोठी मोठी पिक, नभी जाती कणस, शेतकरी हंस,
आज शेतीची झाली हो दैना ॥२॥
गायी लक्षांवधी, वासर गोठ्यामंधी, हात तुपामंधी,
आज खायाला भाकर मिळेना ॥३॥
घोडा बसायाला, तिर मारायाला, शिकार खेळायाला,
आज काठीबी हाती धरवना॥४॥
दांडपट्टा खेळे, डोकी मंदिल झुले, मस्त हत्ती चाले,
आज रडत रावाचा राणा ॥५॥

अशी कशी दशा, याचा शहा निशा, करतो जरा बसा,
नाही शाहीर जरी शहाणा ॥ ६ ॥

२ मत मतांतराचा गलबला.

शिव बाजी गाजी, रणझुंजार बाजी, येसा ताना राजी,
अहो देशाला देण्यांत प्राणा ॥ ७ ॥
लोकमान्य झाले, आज गांधी आले, लाला पंडित बोले,
कोण चालवी तयांचा बाणा ॥ ८ ॥
एक म्हणे उठा, घ्या खादी गठ्ठा, स्वराज्याचा साठा,
तुम्हा देईल सुताचा राणा ॥ ९ ॥
दुजा म्हणे उठा, कौंसिलमधें घुसा, करा घासाघिसा,
वाफ तोंडाची फुकट जाणा ॥१०॥
कोणी म्हणे वासन, धरून बांधा येसण, स्वराज्याची
ओळखण, कशी मुर्दाड डोक्यांत येईना ॥११॥

४

तव्रा येई आव्रा, म्हणे मला शिकवा, स्वराज्याचा ठाव्रा ।
तुम्हा देईन निश्चय जाणा ॥१२॥
अशी कशी दशा, याचा शहा निशा, करतो जरा बसा ।
नाहीं शाहार जरी शाहणा ॥१३॥

(३ याची कारणे)

विद्या निकामि ती, आम्हा बळें देती, वये वाया जाती ।
तनमन धनाची हो दैना ॥१४॥
जगी शास्त्र गती, ना पत्ता देती, ज्ञानार्जना किती ।
मार्गीं अडचणी ठेविल्या नाना ॥१५॥
सैन्य आरमार राष्ट्रकारभार, लठ्ठलठ्ठ पगार ।
आणि सत्ता कदापीहि देईना ॥१६॥
धंदा हुन्नर कला, देशी खुंटावला, पुन्हां काढण्याला ।
कष्टेहि ना मिळे परवाना ॥१७॥

आमची बुद्धिमती, अनुभव असोकिती, पित्ते गोरे अती।
शिरी देती हो घ्यानी हे आणा ॥१८॥
कौन्सिल दिले भारी, केले कारभारी, व्हिटोस्वतःकरी।
तुम्ही रडाकीं नाखूष व्हाना ॥२०॥
नौकरशाहीमधी, शिरता भ्रष्टेबुद्धि, मार्ग खुणे वेधी।
सोडी सर्वस्वी राष्ट्रिय बाणा ॥२१॥
रोग दुष्काळ दैना लोक मरोत काना, खरा उपाय व्हइना।
म्हणे दरसाल कर वाढवाना ॥२२॥
ब्राम्हण अब्राम्हण, किसान अक्षरवान, हिंदु मुसलमान।
भेद पाडुनीं शासिती जाणा ॥२३॥
लोक झाले असाय, यासि काय उपाय, धैर्य धरोनी पाय।
हित संबंध संघा स्थापना ॥२४॥
स्थळी स्थळी जागा सरकार देईल दगा, हे उमगोनी वागा।
एकी करोनी स्वराज्य घ्याना ॥२५॥